# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 09/04/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

**मध्यप्रदेशातुन वर्धा जिल्हयात मोठया प्रमाणामध्ये मद्य वाहतुक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला पोलीसांनी केले गजाआड**
**–: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :–**

कोरोनाच्या उद्रेक मुळे शुरु असलेल्या लॉक–डाऊन दरम्यान अवैध धंदयांवर कारवाई करणेकरिता मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, नागपुर ग्रामिण यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, स्था.गु. शा.ना.ग्रा. यांचे मार्गदर्शनात दि. 08/04/2021 स्थानिक गुन्हे शाखेतील पथक काटोल उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना मुखबीर व्दारे गोपनिय माहीती मिळाली की, एक कथ्या रंगाची अशोक लेलॅन्ड कंपनीची दोस्त माल वाहु गाडी क्र. एम.एच–14/एफ.एम–9478 बडगाव चिचोली मध्यप्रदेश कडुन विदेशी दारु भरुन काटोल मार्गे वर्धा रोड ने जाणार आहे. अशा विश्वसनिय खबरे वरुन पथक वर्धा रोडवरील काटोल हददीतील परसोडी गावाजवळ नाकाबंदी लाउन वाहन चेक करीत असतांना दि. 09/04/2021 चे 01.45 वाजता दरम्यान मुखबीर ने दिलेल्या खबरे प्रमाणे एक कथ्या रंगाची अशोक लेलॅन्ड कंपनीची दोस्त माल वाहु गाडी क्र. एम.एच.14 एफ.एम. 9478 ही गाडी काटोल वरुन धर्ती मुर्ति मार्गे येताना दिसली. गाडी थांबवुन गाडी चालक 1) शिवम मुकेश शर्मा वय 25 वर्ष रा.बालाजी चौक अग्रेसन भवन गली पोलीस चौकी सिटी यवतमाळ ता.जि. यवतमाळ व वाहक 2) गिरीधर दशरथ विठोले वय 39 वर्ष मु.पोस्ट वार्ड क्र. 03. भामराजा पोलीस चौकी यवतमाळ ग्रामिण ता. जि. यवतमाळ यांना गाडी खाली उतरवुन चालकास गाडी मध्ये काय आहे असे विचारले असता गाडी चालकाने अडखळत गाडीच्या डाल्यात Oxycool कंपनीची बिस्लेरी बॉटल असल्याचे सांगीतले. वरुन पाहणी केली असता गाडीच्या डाल्याचे आत Oxycool कंपनीची फिल्टर पाण्याची बॉटल खरडा पॅकींग असलेले पेटया दिसुन आले स्टॉफच्या मदतीने फिल्टर पाण्याच्या एकुण 55 नग पेटया प्रत्येकी 1 लिटर असे एका पेटीत 12 नग प्लास्टिक बॉटल चे 55 खाकी रंगाचे खडडा पेटया खाली उतरविले असता Oxycool कंपनीची बिस्लेरी पेटयाच्या मागे खाकी रंगाचे खरडयावर officer choice blue नावाची विदेशी दारुच्या पेटया त्यावर Manufactured by Allied Blenders and Distillers Pvt. Ltd. Plot No. 2 E, MPIDC Ltd. Borgaon Distt. Chhindwara , Madhya Pradesh 480106 असे दिसुन आले. एक खरडा पेटी खोलुन पाहणी केली असता पेटीमध्ये प्रत्येकी 180 एम.एल. चे 48 काचेच्या दारुच्या बाटल्या असे एकुण 100 खरडा पेटया मध्ये एकुण 4800 नग काचेच्या दारुच्या बाटल्या प्रत्येकी कि. 235/रु असा एकुण 11,28,000/रु चा माल मिळुन आला. तसेच Oxycool कंपनीची फिल्टर पाण्याची 660 नग बॉटल प्रत्येकी कि. 20/रु असा एकुण 13,200/रु असा एकुण 11,41,200/रु चा माल मिळुन आला. चालकास विचारपुस केली असता कोणताही परवाना नसतांना सुध्दा सदर माल हा बडचिचोली मध्यप्रदेश येथुन संजय तायवाडे रा. पांढुर्णा मध्यप्रदेश याचे सांगनेवरुन वर्धा येथे विक्री करीता घेउन जात असल्याचे सांगीतले त्यांचे ताब्यातील अशोक लेलॅन्ड कंपनीची दोस्त माल वाहु गाडी क्र. एम.एच.14 एफ.एम. 9478 मध्ये 100 नग बॉक्स मध्ये एकुण 4800 नग काचेच्या दारुच्या बाटल्या officer choice blue नावाची विदेशी दारु प्रत्येकी 180 एम.एल. प्रत्येकी कि. 235/रु असा एकुण कि 11,28,000/रु चा माल, Oxycool कंपनीची फिल्टर पाण्याची 660 नग बॉटल प्रत्येकी कि. 20/रु असा एकुण 13,200/रु असा एकुण 11,41,200/रु व अशोक लेलॅन्ड

कंपनीची दोस्त माल वाहु गाडी क्र. एम.एच.14 एफ.एम. 9478 कि. 5,00,000/रु असा एकुण 16,41,200/रु चा माल अवैधरित्या बिना परवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांविरुध्द पो.स्टे. काटोल गुन्हा दाखल करुन आरोपी व मुद्येमाल त्यांचे ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास काटोल पोलीस स्टेशन चे स्टॉफ करित आहेत.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजेन्द्र सनोडीया, दुर्गाप्रसाद पारडे, विजय डोंगरे, नापोश पोशि रेवतकर यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर